पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
दिनांक 17/03/2020 (सोमवार)
(सकाळ)

---

दुखापत

1) पो.स्टे. कन्हान :– अंतर्गत 7 नं. नाका कन्हान येथे दिनांक 16/03/2020 चे 15.30 वा. ते 15.45 वा. दरम्यान फिर्यादी नामे– ओमप्रकाश मोहनराव काकडे, वय 37 वर्ष, रा. 7 नं. नाका कन्हान यांचा ओम ऑटोबाईल शोरुम मध्ये आरोपी क्र 01) राजेन्द्र सिंग याने त्याची ॲक्टीवा गाडी सर्विसींग करीता दिली असता आरोपी क्र 02) राहुल सिंग उर्फ पप्पु याने गाडी सर्विसींग चे 250/–रु. च्या कारणावरुन फिर्यादीचे वडीलासोबत वाद–विवाद करुन फिर्यादीस अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन फिर्यादीच्या नाकावर हातबुक्कीने मारहाण करून जखमी केले. फिर्यादीच्या दुकाना मध्ये ठेवलेला एच.पी. कंपनीच्या प्रिंटर वर हात मारुन खाली पाडुन प्रिंटरचे अंदाजे 12,000/–रु. चे नुकसान केले. आरोपीतांनी संगमत करुन फिर्यादीच्या शोरुमच्या समोर रोडवरती अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन फिर्यादीस जिवे मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कन्हान येथे आरोपीतांविरुध्द कलम 324, 294, 427, 506, 34 भादंवी कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोहवा नझीर कुरेशी 8390632202 हे करीत आहे.

2) पो.स्टे. खापरखेडा :– अंतर्गत एपी बार च्या मागे मौजा चनकापुर येथे दिनांक 15/03/2020 चे 16.00 वा. ते 16.30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– राजेश कृष्णाजी डोंगरे, वय 30 वर्ष, रा. ढोके लेआउट, एपी बार च्या मागे चनकापुर यांचा आरोपी नामे– नागोराव गेडाम, रा. यवतमाळ याच्या सोबत घराचे कारणावरून जुने वादविवाद होते. दरम्यान आरोपी हा फिर्यादीचे घराचे विक्रीबाबत बोलत असतांना फिर्यादीने आरोपीस हटकले असता आरोपीने हातात विट घेवुन फिर्यादीचे डोक्यात कपाळावर उजव्या बाजुला मारून जखमी करून तसेच शिवीगाळी करून मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीतांविरुध्द कलम 324, 504, 506 भादंवी कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार रामेश्वर कटरे 9922420496 हे करीत आहे.

## अपघातात मृत्यू

पो.स्टे. खापा :– अंतर्गत 15 कि.मी. अंतरावरील महारकुंड शिवार खापा ते बिचवा रोड येथे दिनांक 16/03/2020 चे 19:15 वा. दरम्यान एमएच– 40/ वाय– 0037 क्रमांकाचा ट्रकचा चालक आरोपीने त्याच्या ताब्यातील वाहन निष्काळजीपणे मौजा माहारकुंड शिवारात कोणत्याही प्रकारचे दिशा सुचक इन्डीकेटर लाईट किंवा पार्कींग लाईट न लावता अंधारात ट्रक उभा केला. दरम्यान एमएच–40/एएच–5470 क्रमांकाचा मोटरसायकल चालक नामे– अमोल रमेश भरसे, वय 27 वर्ष, रा. सिंदेवानी याने उभ्या ट्रकला मागुन धडक दिली. या अपघातात अमोल भुरसे याचा घटनास्थळी मृत्यू झाली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. पारशिवनी येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 304 (अ) भादंवी. सहकलम 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलिस नाईक मनिराम नेवारे 9527360701 हे करीत आहे.

## शासकीय कामकाजात अळथळा निर्माण करणाऱ्या आरोपी विरूध गुन्हा नोंद

पो.स्टे. भिवापुर :– अंतर्गत 13 कि.मी अंतरावर पुल्लर चेक पोस्ट येथे दिनांक 16/03/2020 चे 12.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– योगेश दयाराम ताडाम, वय 27 वर्ष, रा. धामना, ह. मु. कुही, जि. नागपूर (वनरक्षक बिट उमरेड पवनी कऱ्हांडला अभयारण्य) हे सरकारी कर्मचारी असुन आरोपी–काठीयावाडी लाल गाई लोकांनी पूल्लर बिट अभयारण्य मध्ये प्रवेश केले. यानंतर प्रतिबंधक क्षेत्र असल्याने फिर्यादी यांनी काठीयावाडी लोकांना थांबविले असता त्यांनी न ऐकता हातबुक्कीने तसेच काठीने मारहाण करून शासकीय कामात अडथळा निर्माण करून शिवीगाळ करून मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. भिवापुर येथे आरोपी विरुध्द कलम 27, 33 वन्य जीप संरक्षन अधिनियम सहकलम 353, 332, 324, 504, 506 भादंवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर आरोपीतांचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास सपोनि श्री भस्मे 9764946808 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर